**दिनांक: १३/९/२४**

प्रिय सभासद बंधू - भगिनींनो,

मागे आपल्या सोसायटीच्या बिल्डर ने नवीन प्रकल्पात फ्लॅट्स चे तसेच नंतर डुप्लेक्स चे डिझाईन दाखविले होते. ह्या वर सभासदांनी त्या डिझाईन मधे बरेच सुधार / बदल सुचविले.
मधल्या काळात सभासदांनी त्यांना सिंगल, स्प्लिट अगर दोन वेगवेगळ्या आकाराचे फ्लॅट्स हवे असल्याचे ही बिल्डर ला लेखी कळविले.

ह्या सर्व सूचना आणि सभासदांची मागणी विचारात घेऊन त्यात शक्य ते सुधार करून, बिल्डर चे आर्किटेक्ट येत्या २९/९/२४ रोजी (रविवार) मुनोत सभागृहात घरांचे सुधारित डिझाईन्स आपल्याला दाखविणार आहेत.

पंच समिती ने बिल्डर ला सूचित केले आहे कि हे प्रेझेंटेशन 3 D स्वरुपात असायला हवे. ह्यात पूर्ण प्रकल्पा चे प्रारूप, दोन्ही टॉवर्स चे लोकेशन, डुप्लेक्स इमारतींचे लोकेशन, समाज मंदिराची जागा, पोडियम, पार्किंग, विजिटर्स पार्किंग, दिल्या जाणाऱ्या सर्व अमिनिटिज इत्यादी सर्व गोष्टी स्पष्ट पणे कळायला हव्यात. ह्या नंतर प्रत्येक प्रकार च्या फ्लॅट चे आंतरिक डिझाईन्स, डुप्लेक्स चे डिझाईन, लॉबीज, समाज मंदिरा चे डिझाईन पूर्ण डिटेल्स सह दाखविण्यात यावे.

सभासदांना डिझाईन सम्बन्धी तसेच इतर काही शंका असल्यास त्या ही मांडता येतील.

ह्या सादरीकरणा ला संस्थे च्या सर्व सभासदांना तसेच त्यांच्या परिवारातल्या अजून एका सदस्याला उपस्थित राहता येईल (One + One). सभासदांनी त्यांच्या उपस्थिती बद्धल तसेच बरोबर येणाऱ्या बद्धल पंच समिती ला पत्रकार नगर ग्रुप वर २३/९/२४ पर्यंत कळवावे ही विनंती.

ह्या प्रेझेंटेशन चा पूर्ण कार्यक्रम खालील प्रमाणे असेल.

तारीख / वेळ : २९/९/२४ सकाळी ९.०० पासून.
स्थान : मुनोत सभागृह
नाष्टा : सकाळी ९.०० ते ९. ४५
सादरीकरण : सकाळी १० पासून पुढे
जेवण : दुपारी १.३० च्या सुमारास
सादरीकरण संपल्यावर.

धन्यवाद,

प्रदीप नेवाळकर
(पंच समितीच्या वतीने)